संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १०.०७.२०२५ | अंक नं. ८७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

Elite banquet
A.C. बॅन्क्वेट हॉल
अहिल्यानगर मध्ये पहिल्यांदा ए.सी. बॅन्क्वेट हॉल,
भव्य हॉल व प्रशस्त पार्किंग
वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस
शुभकार्य, साखरपुडा
डोहाळे जेवण, मुंज
नामकरण समारंभ
कॉर्पोरेट इव्हेंट्स्
व इ. कार्यक्रमासाठी उपलब्ध
हॉटेल संकेत
टिळक रोड, स्वतिक चौक, स्टेशन रोड, अहिल्यानगर
9422222020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर + 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*

# सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून रस्त्यावरच टाकतात दारूच्या बाटल्या

## मद्यपींकडून आरडाओरडा, शिवीगाळ करत महिला, मुलींच्या छेडछाडीचेही प्रकार

नगर – वाईन्स दुकानाजवळच सार्वजनिक ठिकाणी उघड्यावरच अनेक इसम रोज मद्यपान करून रस्त्यावर दारूच्या बाटल्या टाकतात व कचराही करतात. त्यामुळे अनेक नागरिकांना त्रास होत असून हे मद्यपान करणारे आपसामध्ये भांडणे देखील करतात व मोठ्या प्रमाणात शिवीगाळ करतात व या ठिकाणाहून महिला व मुली येथून जातात त्यांना याचा मोठा त्रास होते व मद्यपान करणारे व्यक्ती हे महिलांची छेडछाड करतात, त्यामुळे परिसरातील नागरिक, व्यावसायिक प्रचंड त्रस्त झाले आहेत.

सदरचा प्रकार नागापूर एमआयडीसी परिसरात घडत आहे. एका वाईन्सच्या दुकानातून लोक दारूच्या बाटल्या घेवून परिसरातील दुकानांच्या समोरच दारू पीत बसलेले असतात, त्यांना शेजारी असलेले दुकानदार व नागरिक काही बोलले तर हे मद्यपान करणारे व्यक्ती दमदाटी करत असतात, त्यामुळे त्यांच्या अशा वर्तनामुळे नागरिकांना यांचा त्रास सहन करावा लागत आहे. *(पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)*

### पोलिस यंत्रणेने मद्यपींना कायद्याचा धाक दाखवून द्यावा

जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांच्या विरोधात सध्या मोहीम सुरु केलेली आहे. एमआयडीसी परिसरात असलेले संबंधित वाईन्स शॉप हे जरी अधिकृत असले, तरी या दुकानाच्या परिसरात, सार्वजनिक ठिकाणी आणि चक्क उघड्यावर दारू पिणे बेकायदेशीर आहे. हे मद्यपी लोक कायदा पायदळी तुडवत आहेत. ते बिनधास्तपणे सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर दारू प्यायला बसत असल्याने त्यांना कायद्याचा काही धाक आहे की नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे आता पोलिस अधिक्षक घार्गे यांनीच अशा लोकांना कायद्याचा धाक दाखवून द्यावा अशी मागणी होत आहे.

कमी गर्दी, कमी किंमत, अल्हाददायक वातावरण, VEENA WORLD
सुपर फन.. जुलै ते सप्टेंबर
पैसा वसूल टूर्स
@ Just 25000 पासुन सुरुवात...
द्वारका सोमनाथ गिरनार (६ दिवस), जयपूर उदयपूर (५ दिवस), जयपूर मंडावा (४ दिवस), भोपाल सांची मधई (४ दिवस)
पाटण मोढेरा स्टॅच्यू ऑफ युनिटी (५ दिवस)
मुन्नार कोचीन अल्लेप्पी (५ दिवस)
सर्व समाविष्ट विमान प्रवासासह मुंबई ते मुंबई
चलो बॅग भरो.. निकल पडो...
वीणा वर्ल्ड प्रेफर्ड सेल्स पार्टनर
राजलक्ष्मी हॉलिडेज्
कालिका प्राईड, २ रा मजला, ऑफिस नं. २०६, लालटाकी रोड, अहमदनगर.
प्रसाद श्रीकांत मांढरे 98500 63432 7083709473

CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
100% JOB ASSISTANCE
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
CAA IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
DISHA COMPUTER INSTITUTE An ISO 9001:2015 Certified
Delhi Gate Branch | Old ST stand Branch | Pipeline Branch
9371051769 | 9371151769 | 7447161769

आपला माणुस, आपला चहा...
रत्नकमल चहा™
ब्रॅंडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा
एक वेळेस जरूर तुलना करून पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर– ४१४००१
Contact : 8767369367

फक्त आणि फक्त नळाचे पाणी ओढण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या व्ही टाईप मोटारी उपलब्ध आहेत
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011

“ दृष्ट लागली सुखाला आमच्यातून नेले तुम्हाला,
प्रेम देता-देता आम्हाला, मध्येच हात सुटला
खेळ असा नियतीने केला, दुःख सागरात सोडून दिले आम्हाला ”



स्व.गणेशराव पांडुरंगराव जोशी
(स्व. ०२/०७/२०२५)

**दशक्रिया विधी**

कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की, स्व.गणेशराव पांडुरंगराव जोशी यांचे बुधवार दि.०२/०७/२०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवार दि.११/०७/२०२५ रोजी सकाळी ८.००, क्षेत्र संगमेश्वर मंदिर, श्री क्षेत्र सिध्देश्वरजवळ, प्रवरासंगम,नेवासा येथे होणार आहे.

: दुःखांकित :
**समस्त जोशी परिवार**
(नेवासा/अहिल्यानगर)
**समस्त देव परिवार**
(भिंगार)

सातवे पुण्यस्मरण – ११ जुलै

**हृदयस्थ**



**कै. डॉ. जयंत श्रीकृष्ण निसळ**

जन्म : २१/११/१९४२ । स्वर्गवास : ११/०७/२०१८

: शोकाकुल :
डॉ. शैलजा जयंत निसळ
डॉ. कौस्तुभ निसळ सौ. डॉ. प्राची आठवले
आणि समस्त निसळ परिवार

BRANDED भरपूर व्हरायटीज्
जीन्स व फॉरमल पॅन्ट
₹ 500 ला एक
₹ 900 ला दोन
₹ 1200 ला तीन
*मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर
9028201188
Terms & Conditions Apply

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# छत्रपती संभाजीनगर व नगर-मनमाड महामार्गावरील 'पथदिवे बंद' मुळे सर्वत्र अंधार : अपघाताला निमंत्रण

## पथदिवे तातडीने सुरु करा अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन करणार : महापालिका उपायुक्तांना निवेदन

नगर - छत्रपती संभाजीनगर व मनमाड रोडवरील पथदिवे गेल्या अनेक महिन्यांपासून बंद पडलेले आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळेत वाहन चालवताना नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. हे दोन्ही रस्ते राष्ट्रीय महामार्ग असल्यामुळे रात्री अवजड वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे. तसेच या मार्गावर शासकीय कार्यालय देखिल आहेत, छत्रपती संभाजी नगर महामार्गावर मुकुंदनगर हे मोठे उपनगर असून या ठिकाणाहून शहरात येणाऱ्या नागरिकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात चालू असते. यापूर्वी डी.एस.पी चौक, नटराज हॉटेल परिसर, अहिल्यानगर महानगरपालिका परिसर, शासकीय विश्रामगृह, सुरभी हॉस्पिटल, वसंत टेकडी परिसरामध्ये सातत्याने अपघात होत असून काही नागरिकांचा या ठिकाणी दुर्दैवी मृत्यू देखील झाले आहे. दररोज छोटे-मोठे अपघात होत आहे, तसेच बाहेरच्या शहरातील नागरिक अहिल्यानगर शहरातून रात्रीच्यावेळी प्रवास करीत असताना सर्वत्र अंधार पडलेला असल्यामुळे आपल्या शहराची बदनामी होत असते. मुकुंदनगर परिसरातील नागरिक या मार्गावरून प्रवास करीत असताना आपला जीव मुठीत धरून करत आहेत.

अंधारामुळे रस्त्यावरील खड्डे दिसत नाही तसेच रिफ्लेक्टर नसल्यामुळे डिव्हायडरवर गाडी जाऊन अपघात होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. रात्रीच्या वेळी डीएसपी चौक हा अपघाती मृत्यूचा सापळा बनला आहे. छत्रपती संभाजीनगर व मनमाड रोडवरील पथदिवे तातडीने सुरू करावे अन्यथा महापालिकेमध्ये तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असा इशारा शम्स हाजी समीर खान यांनी दिला आहे. यावेळी माजी नगरसेवक फैय्याज शेख, अलफिशर शेख आदी उपस्थित होते.


छत्रपती संभाजीनगर व मनमाड रोड महामार्गावरील पथदिवे सुरू करा, अशा मागणीचे निवेदन शम्स खान यांनी उपायुक्तांना दिले. (छाया - लहू दळवी)

## प्रेरणादायी अक्षरधन...



### गुरुविन नाही दुजा आधार...

आषाढीच्या भक्तीमेळ्यानंतर आज आली ती गुरुपौर्णिमा अर्थात व्यास पौर्णिमा. सद्गुणांची आस व चांगुलपणाचा ध्यास याची पूर्तता करण्यास गुरू असणं जीवनावश्यक आहे. जीवनाचं खरं ध्येय, उद्देश व पूर्तता होण्यासाठी योग्य गुरू असणं व लाभणे हे महत्त्वाचं!

आपली सनातनी संस्कृती व परंपरा वैभवशाली आहे. गुरू शिष्यांच्या अनमोल नात्यांनी समाज व संबंधित समृद्ध झाले व होतात.

महर्षी व्यास, सप्तऋषी, विविध धर्म, जाती पंथातले गुरु यांनी आपल्या शिष्यांना आणि समाजाला नैतिक, अध्यात्मिक अधिष्ठान मिळवून देण्याचे निरंतर प्रयत्न केले आहेत.

एकवेळ ईश्वर नाही मिळाला तरी ठीक पण योग्य, अधिकारी गुरू लाभणे हे खरे भाग्यशाली जीवन. सक्षम गुरू मिळाल्यास जीवन सार्थकी लावता येवू शकते. आजच्या शुभदिनी श्रीकृष्ण अर्जुन, एकलवय द्रोणाचार्य, निवृत्तीनाथ ज्ञानेश्वर, मुक्ताई चांगदेव, आनंदऋषीजी आदर्शऋषी - प्रवीणऋषीजी अशा अनेक प्रेरणादायी गुरुशिष्यांचे स्मरण करणे, त्यांना अभिवादन करणे आवशयक. खरं तर प्रत्येकालाच गुरू लाभणे गरजेचे पण एक शिष्य बनून आपल्याला त्याची जाणीव होणे गरजेचे. त्यासाठी वाचन, मनन, चिंतन यांची बैठक ठेवून नैतिक, भक्तीभावाचे अधिष्ठान आपल्या ठायी असावे. ही बैठक असल्यासच गुरू मिळणे सोपे. अहे नांगरलेल्या भूमीतच चांगलं बी रुजेल व पीक येईल ना?

गुरुकृपेशिवाय निर्गुणाचं ज्ञान होणार नाही आणि निर्गुण ज्ञानाशिवाय सच्च्या शिष्याला माऊलीसम समाधी सौख्य लाभणार नाही. आपण सर्वसामान्यांनी आजच्या व्यावसायिक व समाज माध्यमांवरील नवनव्या उपदेशकांच्या फार गावी न जाता स्वत:ची अधिकाधिक बौद्धिक, अध्यात्मिक प्रगल्भता वाढवल्यास किमान (मानसिक) मानलेल्या गुरुंच्या श्रद्धेने उच्च शिष्यत्त्व मिळू शकेल. सर्व ज्ञात अज्ञात गुरुंना मनस्वी दंडवत.

**- किशोर गांधी**
(मो.९८२२०२०६९१)

### रात्री संशयास्पदरित्या फिरणाऱ्याला पकडले

नगर - मध्यरात्रीच्या सुमारास अंधाराचा फायदा घेत काहीतरी गुन्हा करण्याच्या तयारीत संशयास्पद रित्या वावरणाऱ्या तरुणास कोतवाली पोलिसांनी पकडले. ही कारवाई स्टेशन रोडवरील जिल्हा बँकेसमोर अण्णाभाऊ साठे वसाहत येथे ९ जुलै रोजी पहाटे १ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

या कारवाईत अरसद इसरत खान (वय १९, मूळ रा. रसुलपुर दरेहटा, उत्तर प्रदेश, सध्या रा. जुनी महानगर पालिका जवळ, माळीवाडा, अ.नगर) असे पकडलेल्या तरुणांचे नाव आहे. ९ जुलै रोजी पहाटे १ वाजेच्या सुमारास जिल्हा बँक समोर असलेल्या अण्णाभाऊ साठे वसाहतीजवळ तो संशयास्पदरीत्या आढळून आला. रात्रीच्या अंधारात आपली ओळख लपवत तो गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याचे समोर आले. या प्रकरणी पो. कॉ. सचिन लोळगे यांच्या फिर्यादीवरुन अरसद खान याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र औटी हे करत आहेत.

# मुळा धरणाचे सर्व ११ दरवाजे उघडले, '३००० क्युसेक'ने नदीत विसर्ग सुरु

## धरणाचा साठा अठरा टीएमसीपेक्षा जास्त झाल्याने पाणी जायकवाडी धरणामध्ये सोडले



राहुरी - पाणलोट क्षेत्रातील पावसामुळे मुळा धरणात सातत्याने पाण्याची आवक सुरू असून, ९ जुलै रोजी धरणाचा साठा १८ टीएमसीपेक्षा जास्त झाल्याने सायंकाळी धरणातून मुळा नदीत विसर्ग सोडण्यात आला. मुळा पाटबंधारे प्रशासनाने कार्यकारी अभियंता सायली पाटील यांच्या आदेशान्वये धरणालगतच्या गावांना सायरनद्वारे सतर्कतेचा इशारा देत सायंकाळी ५ वाजता धरणाचे सर्व ११ दरवाजे उघडले. तीन हजार क्यूसेक वेगाने पाणी नदीतून जायकवाडी धरणाकडे झेपावले. धरणातून नदीतच झेपावणारे पाण्याचे दृश्य टिपण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती.

मुळा धरणाच्या पाणीसाठ्यामध्ये यंदा अवकाळी आणि मान्सूनपूर्व पावसाच्या कृपेने मोठ्या प्रमाणात वाढ झाली. धरणाच्या इतिहासात पहिल्यांदाच जुलैच्या पहिल्या-दुसर्या आठवड्यात धरणाचा साठा १८ टीएमसीच्या पुढे गेला. मान्सूनपूर्वी धरणामध्ये ८९०० दशलक्ष घनफूट इतका समाधानकारक पाणीसाठा शिल्लक होता. त्यानंतर मान्सून काळात एकूण ९१८८ दशलक्ष घनफूट पाणी नव्याने जमा झाले. शासकीय जलाशय परिचलन आदेशानुसार १ ते १५ जुलैपर्यंत धरणसाठा १८ हजार १६१ दशलक्ष घनफूट पाणीसाठा नियंत्रित राखणे गरजेचे आहे. त्यानुसार हा टप्पा गाठताच ९ जुलै रोजी धरणातून पाणी सोडण्याचा आदेश झाला. त्यापूर्वी नदीलगतच्या गावांना, तसेच राहुरी नगरपरिषद हद्दीमध्ये दवंडीद्वारे सतर्कतेचा इशारा देण्यात आला.

दरम्यान, धरणातून पाणी सोडले जात असताना धरणाकडे ५३२७ क्यूसेक वेगाने पाण्याची आवक होत होती. धरणाचे सर्व ११ दरवाजे ६ इंच वर उचलण्यात आले आहेत. प्रत्येक दरवाज्यातून २७२ क्यूसेक असे एकूण तीन हजार क्यूसेकने पाणी जायकवाडीच्या दिशेने झेपावत आहे. १५ जुलैपर्यंत १८ हजार १६१ दशलक्ष घनफूट साठा ठेवत उर्वरित पाणी कमी-जास्त प्रमाणात नदीत सोडले जाणार आहे.

पाणी सोडताना कार्यकारी अभियंता सायली पाटील, उपअभियंता विलास पाटील, शाखा अभियंता राजेंद्र पारखे, कनिष्ठ अभियंता घोरपडे, सलीम शेख व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

मुळा धरणाचे पाणलोट क्षेत्र असलेले कोतूळ, पांजरे, हरिश्चंद्रगड परिसरात पाऊस सुरूच आहे. त्यामुळे धरणाकडे होणारी आवक कमी जास्त प्रमाणात होत आहे. दिवसभर आवकेत घट होत असताना सायंकाळच्या आकडेवारीमध्ये आवक किंचित वाढली. सायंकाळी ५३२७ क्यूसेक आवक होत होती.

### नेनसुखलाल नहार यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील रहिवाशी नेनसुखलाल भागचंद नहार (वाळकीवाला, वय ९३) यांचे ९ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते जैन ओसवाल पतसंस्थेचे संस्थापक संचालक व जैन ओसवाल पंचायतचे माजी विश्वस्त होते. प्रमोद, अतुल नहार यांचे वडील तर गौरव नहार यांचे ते आजोबा होत.

### अमृतलाल पोखरणा यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सावेडी बंधन लॉन जवळील बदामनगर येथील रहिवासी अमृतलाल हरकचंद पोखरणा (ढवळपुरीवाला, वय ८५) यांचे १० जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. दिपाली बोरा, किशोर, अजय पोखरणा यांचे ते वडील होत.

### श्रीमती सिंधुताई गुळवे यांचे निधन



नगर - साईनगर नक्षत्र लॉन पाठीमागील रहिवासी श्रीमती सिंधुताई गोपाळकृष्ण गुळवे (वय ८२) यांचे ९ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर काटवन खंडोबा येथील लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे ३ मुले, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. महेश गुळवे तसेच डॉ. मनिषा राऊत यांच्या त्या मातोश्री होत.

### श्रीमती पवनकुंवर उपाध्ये यांचे निधन



नगर - नवीपेठ येथील रहिवासी श्रीमती पवनकुमार कुंदनमल उपाध्ये (वय ९२) यांचे ८ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे ४ मुले, सुना, नातवंडे, नात सुना असा परिवार आहे. नगरमधील बांधकाम व्यावसायिक राजेश उपाध्ये व दिनेश उपाध्ये यांच्या त्या मातोश्री होत. मोहित, यश, चिराग यांच्या त्या आजी होत. नेत्रदान करुन त्यांनी एक आदर्श निर्माण केला आहे.


एमआयडीसी परिसरातील एका वाईन्स शॉप शेजारी उघड्यावरच दारू प्यायला बसलेले मद्यपी.

# सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून रस्त्यावरच टाकतात दारूच्या बाटल्या

*(पान १ वरुन)*

हे लोक अशा प्रकारे सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून नागरिकांना रोज त्रास देत असतात. असे प्रकार गेल्या अनेक दिवसांपासून सुरु आहेत.

सदर सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून त्रास देणाऱ्या इसमांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी नागरिकांच्या वतीने १८ मे २०२४ रोजी पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले होते. मात्र या निवेदनाची कोणतीही दखल घेतली गेली नाही. त्यानंतरही अनेक वेळा पोलिस प्रशासनाला निवेदने देण्यात आली आहेत मात्र हे प्रकार काही थांबलेले नाहीत. त्यामुळे लवकरात लवकर या मद्यपान करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यात यावी अन्यथा नगर-मनमाड महामार्गावर एमआयडीसी परिसरात रस्ता रोको करण्याचा इशारा नागरिकांच्या वतीने देण्यात आला आहे.

# एजन्सी देण्याच्या आमिषाने नगरमधील तरूणीची ३० लाख रुपयांची फसवणूक

## मुंबईच्या दोघांविरोधात गुन्हा दाखल

नगर - विमान तिकीट बुकिंग एजन्सीच्या नावाखाली दिल्या जाणार्या कमिशनचे आमिष दाखवून नगर मधील एका व्यावसायिक तरूणीची ३० लाख रूपयांची फसवणूक करण्यात आल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात मुंबईच्या दोन जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आचल पवनकुमार अग्रवाल (वय. २४, रा. तांबटकर मळा, गुलमोहोर रोड, सावेडी) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी यांचे वडील नगर एमआयडीसी येथे श्रीराम इंडस्ट्रीज नावाची कंपनी चालवतात. ऑगस्ट २०२४ मध्ये कुटुंबीयांसाठी विमान तिकीटांची व्यवस्था करताना त्यांची ओळख अनुज अनिल मित्तल यांच्याशी झाली. त्याचवेळी मित्तल यांनी त्यांना रिजॉईस इव्हेंट ऑर्गनायजेशन या कंपनीबाबत माहिती दिली, जी फ्लाईट व हॉटेल बुकिंगसाठी एजंट शोधत होती.यानुसार मित्तलने २७ ऑगस्ट २०२४ रोजी नगरमधील अक्की बर्गर,प्रोफेसर चौक येथे अग्रवाल यांची भेट राहुल दर्शन जगताप आणि त्याची पत्नी एंजल राहुल जगताप (दोघे रा. सानपाडा, नवी मुंबई) यांच्याशी घालून दिली. त्यांनी अग्रवाल यांना कंपनीची एजन्सी देण्याचा प्रस्ताव ठेवला. तुम्ही गुंतवणूक केल्यास १५ टक्के कमिशन मिळेल, असे आमिष त्यांना दाखवले. मात्र त्यासाठी सुरुवातीस ३० लाखांची गुंतवणूक करावी लागेल असे सांगण्यात आले.

अग्रवाल यांनी येस बँक, सावेडी शाखेमधून ३० लाख रुपयाची रक्कम सुशिला दर्शन जगताप यांच्या खात्यात ट्रान्सफर केली. मात्र त्यानंतर ना कोणताही करारनामा झाला, ना एजन्सी मिळाली. अग्रवाल यांनी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण जगताप दांपत्य टाळाटाळ करु लागले आणि शेवटी फोन बंद ठेवू लागले.त्यामुळे फसवणूक झाल्याचे अग्रवाल यांच्या लक्षात आले. याप्रकरणी आंचल अग्रवाल यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात राहुल जगताप व एंजल जगताप यांच्याविरोधात बी एन एस कलम ३१८ (४), ३१६ (२), ३ (५) प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात केला. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक गोंटला हे करीत आहेत.

# स्थानिक उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करु

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

नगर - जिल्ह्यातील उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितले.


शहरातील अहमदनगर ॲटो ॲण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर येथे आयोजित निर्यात व मैत्री कार्यशाळेमध्ये बोलताना जिल्हाधिकारी पंकज आशिया.

अहमदनगर ॲटो ॲण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर येथे आयोजित निर्यात व मैत्री कार्यशाळेत ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक दीपक शिवदास, अतिरिक्त कामगार आयुक्त तथा समन्वय अधिकारी (मैत्री सेल, मुंबई) भास्कर मोराडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा दुग्धविकास अधिकारी गिरीश सोनोने, डीजीएफटी विभाग प्रमुख मंदा शेटे, पशूसंवर्धन उपायुक्त उमेश पाटील आदी उपस्थित होते.

जिल्ह्याला जागतिक निर्यातीच्या नकाशावर ओळख मिळावी आणि जिल्ह्यातील उद्योजक, शेतकरी व व्यावसायिकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली असल्याचे डॉ. आशिया म्हणाले. या कार्यशाळेत उद्योजकांना निर्यातविषयक प्रशिक्षण देऊन सक्षम करण्यावर भर देण्यात आला. या माध्यमातून जिल्ह्यातील उत्पादने जागतिक पातळीवर पोहोचविण्यास मदत होईल. कार्यशाळेतून उद्योजकांना मोठा फायदा होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी विद्या बाडीगर व अरुल कान्हेरे यांनी निर्यात प्रक्रियेतील टप्प्यांविषयी सविस्तर माहिती दिली. निर्यात सल्लागार दानिश शेख यांनी नवोद्योगांनी व्यवसायाची सुरुवात कशी करावी, यावर मार्गदर्शन केले. ईवाय कन्सल्टन्सीचे सूरज जाधव यांनी जिल्ह्यातील निर्यातीच्या संधी व सद्यस्थितीचा आढावा सादर केला.

भास्कर मोराडे यांनी 'महाराष्ट्र इंडस्ट्री, ट्रेड ॲण्ड इन्व्हेस्टमेंट फॅसिलिटेशन सेल' (MAITRI) पोर्टलच्या माध्यमातून मिळणाऱ्या सुविधांची माहिती दिली. श्री. पुरी व श्री. देशमुख यांनी कृषी उत्पादनांच्या निर्यातीतील संधी व विपणन व्यवस्थेवर मार्गदर्शन केले. मॅगनेट उपक्रमाची माहिती सनी काटे यांनी दिली. जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग निरीक्षक खलील हवालदार यांनी रोजगाराशी संबंधित शासकीय योजनांची माहिती दिली. यावेळी महाव्यवस्थापक दीपक शिवदास यांनी कार्यशाळा आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली.

कार्यशाळेची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. जिल्ह्यातील उद्योजक, व्यावसायिक, नवउद्योजक, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रवर्तक व सभासद, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तर सत्रात उपस्थितांनी आपल्या शंकांचे समाधान करून घेतले. जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक अण्णासाहेब बेरे यांनी सहभागींचे आभार मानले.


गुरुपौर्णिमा निमित्त श्री विशाल गणेश मंदिर येथे गुरु गेंडानाथ महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. यावेळी महंत संगमनाथ महाराज, आदेशनाथ महाराज, सोहमनाथ महाराज आदी उपस्थित होते.

### नागापूर परिसरातून दोन मोटारसायकलची चोरी

नगर - शहरासह उपनगरात वाहन चोरीच्या घटना सुरूच असून नागापूर परिसरातून एकाच दिवशी २ मोटारसायकली चोरीला गेल्या आहेत. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात ८ जुलै रोजी दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ॲड. राजेंद्र आसाराम कातोरे (वय ४९, रा. कातोरे नगर नागापूर) यांच्या नवीन बंगल्याचे बांधकाम नागापूर येथील माताजीनगर जवळ सुरु आहे. या बंगल्याच्या बांधकामाच्या कंपाऊंडच्या बाहेर लावलेली होंडा कंपनीची सी डी १०० एस एस मोटारसायकल (क्र. एम एच १६ के ३६६१) अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात ॲड. कातोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत बाळासाहेब नवनाथ धुमाळ (वय ४५, रा. माताजीनगर, आयटी पार्क च्या मागे, नागापूर) यांनी त्यांच्या घरासमोर रस्त्याच्या कडेला लावलेली बजाज कंपनीची प्लॅटिना मोटारसायकल ( क्र. एम एच १७ सीसी ३५७७) अज्ञात चोरट्याने नजर चुकवून चोरुन नेली.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात बाळासाहेब धुमाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जगाला वाचवण्याची ताकद अहिंसा परमो धर्म या शिकवणीमध्ये आहे

**मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचे प्रतिपादन; ११ वर्षानंतर केडगावच्या जैन स्थानिकात चातुर्मासास भक्तिपूर्ण वातावरणात प्रारंभ, महासती दिव्यदर्शनजी महाराज व महासती पुनीतदर्शन महाराज या साध्वींचा उत्साहात मंगल प्रवेश**

नगर – जैन धर्मासह हिंदू धर्मातही चातुर्मासाला अनन्यसाधारण महत्व आहे. या कालावधीत साधुसंतांच्या सानिध्यात केलेली तप, जप, साधना फलदायी ठरते व आपल्यामधील अहंकार गळून पडतो. जैन धर्माने अहिंसेची शिकवण ही जगाला दिलेली फार मोठी देणगी आहे. आज जगात सर्वत्र युद्धजन्य परिस्थितीमुळे अशांतता पसरली असताना या जगाला वाचवण्याची ताकद अहिंसा परमो धर्म या शिकवणीमध्ये आहे. जगात शांतता नांदण्यासाठी जैन धर्माच्या सगळ्या तत्वांचे तंतोतंत पालन करून ते आत्मसात करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले.



केडगावच्या जैन श्रावक संघाच्या जैन स्थानकात महासती दिव्यदर्शनजी महाराज व महासती पुनीतदर्शन महाराज यांच्या चातुर्मासाला प्रारंभ झाला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचा विशेष सन्मान केडगावच्या जैन श्रावक संघाच्या वतीने करण्यात आला.

जैन धर्मातील सर्वात पवित्र असलेल्या चातुर्मास महापर्वानिमित्त केडगावच्या जैन श्रावक संघाच्या पाच गोडाऊन येथील जैनस्थानकात महासती दिव्यदर्शनजी महाराज व महासती पुनीतदर्शन महाराज या साध्वींचा उत्साहात मंगल प्रवेश झाला. महासती साध्वींच्या मंगल प्रवेशनिमित्त परिसरातील जैन समाजातील नागरिकांनी उत्साहात महासतींचे स्वागत केले. अंबिका हायस्कूल जवळील सम्राट बरमेचा यांच्या निवासस्थानापासून जैनस्थानकपर्यंत मंगल प्रवेशाची शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी भाविक पारंपरिक वेशभूषेत उत्साहात साधु स्वाध्वींचा जयजयकार करत सहभागी झाले होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे आनंद भंडारी यांचा विशेष सन्मान केडगावच्या जैन श्रावक संघाच्या वतीने करण्यात आला.

आचार्य परमपूज्य आनंदऋषीजी महाराजांचे सानिध्य लाभलेल्या या अहिल्यानगरच्या पवित्र भूमीतील केडगाव भागात अकरा वर्षांनी भक्तिपूर्ण वातावरणात चातुर्मास होत आहे. हा चातुर्मास ऐतिहासिक ठरेल, असे सांगून साध्वी दिव्यदर्शनजी महाराजांनी सर्वांना शुभाशिष देत मार्गदर्शन केले.

आनंद भंडारी पुढे म्हणाले, केडगावमध्ये ११ वर्षांच्या खंडानंतर होणाऱ्या चातुर्मास सोहळ्यामुळे महान तपस्वी साध्वींचे सानिध्य समजातील बंधू, भगिनींना मिळणार असल्याने सर्वत्र उत्साह निर्माण झाला आहे. केडगावच्या जैन श्रावक संघाच्या सर्व कार्यकारणीने उत्साहात याचे उत्कृष्ट नियोजन केल्याने हा चातुर्मास सफल होईल. जैन समजातून मला जे संस्कार, शिकवण व संवेदना मिळाली, त्यामुळेच मी आज मोठ्या पदावर आहे.

यावेळी बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, जैन श्रावक संघाचे सचिव संतोष बोथरा, ऑल इंडिया जैन कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष बाबुशेठ लोढा, टाकळी ढोकेश्वर संघाचे अध्यक्ष राजेश भंडारी, वांबोरी संघाचे सुनील बोथरा, सारसनगर संघाचे पोपटलाल भंडारी, चांदा (ता.नेवासा) संघांचे अजित गुगळे, पैठण संघाचे रमेश शिंगवी आदींसह जैन समाजातील नागरिक, महिला, युवक, युवती उपस्थित होते. केडगावच्या श्री वर्धमान जैन श्रावक संघांचे सर्व ट्रस्टी, गुरुदेव युवा फौंडेशनचे सर्व युवा सदस्य, गुरुदेव महिला मंडळाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना सोहन बरमेचा यांनी केले. मयूर चोरडिया यांनी आभार मानले.



लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला.

## लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

नगर – भारतीय संस्कृतीत गुरुला अतिशय महत्व आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक ज्ञानाची शिदोरी गुरुकडून शिष्याला मिळते. अशा गुरुप्रती कायम कृतज्ञ रहायला हवे असा संदेश देत लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या सारसनगर, इमारत कंपनी व धर्माधिकारी मळा या तीनही शाखांमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

गुरु पौर्णिमेनिमित्त लिटिल फ्लॉवर प्री स्कूलध्ये चिमुरडयांनी विविध धर्माच्या धर्मगुरुंची वेशभूषा परिधान करून नाटिका, गाणे, पौराणिक कथा, संगीत नृत्य असे कलाविष्कार सादर केले. महाभारतातील एकलव्य व गुरु द्रोणाचार्य या गुरुशिष्याचे नाते, जैन धर्मातील गुरु व नवकार महामंत्र, मुस्लिम समाजातील मौलाना तसेच अन्य धर्मातील गुरुंविषयी कार्यक्रम सादर करण्यात आले.

संचालिका मनिषा बोगावत म्हणाल्या, गुरु पौर्णिमा हा गुरुप्रती निष्ठा व कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. शाळेत मुलांच्या मनावर लहान वयापासूनच जीवनातील गुरुच महत्वपूर्ण स्थानाविषयी मार्गदर्शन केले जाते. मुलांनी गुरुपौर्णिमा साजरी करताना अतिशय उद्बोधक कार्यक्रम सादर केले. गुरु साक्षात परब्रम्ह या विषयावर गायन सादर करण्यात आले. गुरू आपल्याला जे ज्ञान देतात ते आपल्या आयुष्याला दिशा देणारे असते. गुरुच्या मार्गदर्शनामुळे शिष्य कोणत्याही अडचणीचा यशस्वीपणे सामना करून सकारात्मक ऊर्जा मिळवू शकतो, असा संदेश यानिमित्त देण्यात आला. कार्यक्रमासाठी तीनही शाळांतील शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# गुरूंच्या सानिध्यामुळे जीवन परिवर्तन होते

**भगवान फुलसौंदर यांचे प्रतिपादन; नक्षत्र प्राणायाम ग्रुपतर्फे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी, योग प्रशिक्षक अविनाश ठोकळ व सौ.कल्पना ठोकळ यांचा सत्कार**

नगर – नक्षत्र परिवार हे कुटुंब आहे. योगप्रशिक्षक अविनाश ठोकळ व सौ. कल्पना ठोकळ यांनी गेल्या सोळा वर्षापासून योगाच्या माध्यमातून सर्वांना उत्तम आरोग्य दिले आहे. योग शिक्षक ठोकळ कुटुंबांच्या योगदानामुळे सर्व निरोगी झाले आहेत. योगाच्या माध्यमातून शंभर कुटुंबे नक्षत्र परिवाराला जोडली गेली आहेत. योगसाधनेमुळे करोडो रुपयांपेक्षाही अनमोल असलेल्या देहाचे जतन केले जाते. समाजाच्या सेवेसाठी व उत्तम आरोग्यासाठी मंगल कार्यालय विनामूल्य उपलब्ध केले आहे. संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज यांनी सांगितल्याप्रमाणे देव माणसातच आहे. गुरु हेच आदर्श आहेत.गुरूंच्या सहवासाने सर्वांचे जीवन परिवर्तन होते, असे प्रतिपादन माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी केले आहे.



बुरुडगाव रोड येथील नक्षत्र मंगल कार्यालय येथे नक्षत्र प्राणायाम ग्रुपतर्फे गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

बुरुडगाव रोड येथील नक्षत्र मंगल कार्यालय येथे नक्षत्र प्राणायाम ग्रुप तर्फे गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी योगगुरु रामदेव बाबा यांचे पूजन करून सर्वांच्या उत्तम आरोग्यासाठी रत्नाकर जोशी यांच्या हस्ते होमहवन करण्यात आले. व योग प्रशिक्षक अविनाश ठोकळ व योग शिक्षिका सौ.कल्पना ठोकळ या दांपत्यांच्या विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भगवान फुलसौंदर, रत्नाकर जोशी, रघुनाथ केदार, साहेबराव बोरुडे, डॉ.केवलकृष्ण कनोजीया, ब्रह्मानंद पारिख, लक्ष्मण आव्हाड, सुधीर बाफना, गोरख चौधरी, सुनील फुलसौंदर, प्रा.प्रफुल्ल गायकवाड, ज्ञानेश्वर कुलथे, योग शिक्षिका सौ.वनिता दगडे, अलकाताई मुंदडा, सौ.भोईर, सौ.गायकवाड, सुनिताताई फुलसौंदर, सौ.पठारेताई आदींसह नक्षत्र परीवार प्राणायाम ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

अविनाश ठोकळ म्हणाले, भगवान फुलसौंदर यांनी योग साधनेसाठी नक्षत्र मंगल कार्यालय विनामूल्य उपलब्ध करून दिले आहे. या योगवर्गात विनामूल्य प्रशिक्षण दिले जाते. या योगा वर्गात शंभर कुटुंबे जोडले गेली आहेत. उत्तम आरोग्यासाठी योग गुरु रामदेव बाबा यांनी सांगितलेली योग साधना करावी. प्रत्येकाच्या जीवनात गुरुचे महत्त्व आहे.गुरु दृष्टी नाहीतर दृष्टिकोन देत असतात विचार नाही तर विवेक देत असतात.गुरूंचे स्थान प्रत्येकाच्या जीवनात महत्त्वाचे आहे.

वनिता दगडे म्हणाल्या, भारतीय संस्कृतीत गुरु शिष्य परंपरा महान आहे.द्रोणाचार्य– एकलव्य, चांगदेव महाराज– मुक्ताई असे अनेक उदाहरणे इतिहासातील देता येतील. सूत्रसंचालन लक्ष्मण आव्हाड यांनी केले. रघुनाथ केदार यांनी आभार मानले.



आषाढी एकादशीचे औचित्य साधून अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित अभंगवारी कार्यक्रम रोजी सावेडी येथील माऊली सभागृहात पार पडला.

# विठ्ठलभक्तीरसात न्हाऊन निघाले अहिल्यानगरकर

**अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर आयोजित अभंगवारी कार्यक्रमास रसिकांचा भर पावसातही हाऊसफुल्ल प्रतिसाद**

नगर – जय जय राम कृष्ण हरी, सुंदर ते ध्यान, रूप पाहता लोचनी, बोलावा विठ्ठल, ज्ञानियांचा राजा, या पंढरीचे सुख, पांडुरंग नामी, पतित तू पावना, माझे माहेर पंढरी, अवघे गरजे पंढरपूर, कानडा राजा पंढरीचा अश्या एकाहुन एक सरस अभंग सादरीकरणाने विठ्ठल भक्तीरसात अहिल्यानगरकर न्हाऊन निघाले.

आषाढी एकादशीचे औचित्य साधून अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित अभंगवारी हा कार्यक्रम ७ जुलै रोजी सावेडी येथील माऊली सभागृहात पार पडला. कार्यक्रमास नगरकर रसिकांचा भर पावसातही हाऊसफुल्ल प्रतिसाद मिळाला. ज्ञानोबा, तुकोबा, नामदेव, मुक्ताबाई, कान्होपात्रा यासह अन्य काही संतांच्या अभंग रचना या कार्यक्रमात सादर झाल्या. तसेच दिंडी, रिंगण, धावा या सारखे वारीत होणारे कार्यक्रम सुद्धा अनाहत च्या छोट्या सदस्यांनी सभागृहात सादर केले त्याला रसिकांनी दाद दिली.

नगरमध्ये अनेक वर्षांपासून गायन क्षेत्रात आपली सेवा देणारे गायक कलाकार सौ. अनुजा कुलकर्णी, अभिजीत आपस्तंभ, ओंकार देऊळगावकर, सौ.अमृता बेडेकर, सौ. रश्मी गंधे, सौ. श्रेया सुवर्णपाठकी, कु. स्वरा देऊळगावकर यांनी आपल्या सुरेल स्वरांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. अनेक गाण्यांना वन्स मोअर चा प्रतिसाद देत रसिकांनी कलाकारांना दाद दिली. साथसंगत करणारे वादक कलाकार तबला व टाळ प्रसाद सुवर्णपाठकी, आनंद कुलकर्णी, सुपर्ण प्रताप., पखवाज सौरभ साठे, संवादिनी संकेत सुवर्णपाठकी, प्रणव देशपांडे, तालवाद्य कुलदीप चव्हाण यांनी सुद्धा आपल्या सुरेल आणि सुयोग्य वादनाने कार्यक्रमात रंगत आणली. तबला, टाळ आणि पखवाज याच्या जुगलबंदीने रसिकांना थेट वारीत गेल्याचा आनंद मिळाला.

या कार्यक्रमाची संकल्पना व दिग्दर्शन नाट्य परिषद उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रा. प्रसाद बेडेकर यांचे होते. अभंग गायनाच्या या कार्यक्रमाला एक नाट्यात्म अनुभव देण्याचा अनोखा प्रयोग या निमित्ताने करण्यात आला. मंच व्यवस्था नाना मोरे, प्रकाश योजना गणेश लिमकर, बंटी ढोरे व ध्वनी व्यवस्था अवधूत गुरव यांची होती. महेश काळे आणि चैताली बर्डे यांनी निवेदन केले.

सुरवातीला अनिल बोरुडे, सौ. पुष्पाताई बोरुडे, धनेश बोगावत, विलास बडवे, लक्ष्मणराव डहाळे, अशोक गांधी, पवन नाईक, दिनकर घोडके, पी. डी. कुलकर्णी, ज्ञानेश्वर दुधाडे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माणिक देव व सौ. जान्हवी देऊळगावकर यांनी केले. वैदेही बोरा यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगेश पंडित, रघुनाथ सातपुते, प्रसाद लामरुड, महेश कुलकर्णी, अविनाश शिरापूरी, संदिप कुलकर्णी, डॉ. हृषीकेश कुलकर्णी, सौ. मोहिनी खोल्लम, सौ. प्रज्ञा असनीकर, कृष्णा बेलेकर, सोहम सौंदणकर, सौ. अनघा पछाडे, कु. वैष्णवी कुलकर्णी, सौ. दीप्ती शुक्रे यांनी परिश्रम घेतले.

तसेच कार्यक्रमासाठी शिल्पकार प्रमोद कांबळे, भारतीय जनता पार्टीचे माजी शहर जिल्हाध्यक्ष भैय्या गंधे, बालरंगभूमी परिषदेचे महाराष्ट्राचे प्रमुख कार्यवाह अनंत जोशी, किशोर कुलकर्णी, भूषण भणगे, अविनाश देऊळगावकर, शेखर दरवडे, चंद्रकांत पंडित आदी उपस्थित होते.

# ‘घरटी एक वृक्ष’ लावून बागुलपंडुगु साजरा करा



सौ. वीणा बोज्ञा

नगर – पद्मशाली समाजाचा बागुलू पंडुगू सण म्हणजेच बागेचा सण म्हणून गेल्या कित्येक वर्षापासून आषाड महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेनंतर साजरा केला जातो. याही वर्षी हा सण समाजाने घरटी एक वृक्ष लावून साजरा करावा, असे आवाहन माजी नगरसेविका सौ. वीणाताई बोज्ञा यांनी केले आहे.

११ जुलै रोजी हा साजरा होत असून बागुलू पंडूगू हा सण थाटात माटात समाजातील सर्व घटक एकत्र येऊन शहरातील बालिकाश्रम येथील मंदिरात व तोफखाना भागातील मंदिरात तसेच सावेडी उपनगरातील श्रमिकनगर येथे उत्साहाने साजरा केला जातो.

या दिवशी समाजातील लोक देवीला साकडे घालून प्रार्थना करून निसर्गाचे रक्षण करण्यासाठी तसेच पर्जन्यवृष्टी ही संतुलित प्रमाणात होण्यासाठी व दुष्काळ अगर अतिवृष्टी होऊ नये, यासाठी व या काळात होणारी रोगराई दूर व्हावी, यासाठी देवीला प्रार्थना केली जाते. या सणाला बागेचा सण म्हणून संपूर्ण महाराष्ट्र मध्ये प्रसिद्ध असून महाराष्ट्रमध्ये ज्या ज्या ठिकाणी पदमशाली समाजातील लोक राहतात त्या त्या ठिकाणी त्यांचे सोयीने हा सण उत्साहात साजरा केला जातो. तसेच ज्यांना वृक्षारोपणसाठी रोपे नसतील त्यांनी मला संपर्क करावे त्यांना विनामूल्य रोपांची व्यवस्था केली जाईल, अशी माहिती सौ. वीणा बोज्ञा यांनी दिली.

# आझाद मैदानावरील आंदोलनाला यश

नगर – आझाद मैदानावरील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा संदर्भात चालू असणारे आंदोलनास यश मिळाले असून शिक्षकांना न्याय मिळाला अशी भावना शिंदे यांनी व्यक्त केली. शिक्षक समन्वय संघाच्या वतीने वतीने ८ व ९ जुलै रोजी शाळा बंद आंदोलन पुकारले होते. या आंदोलनाला राज्यातील हजारो शिक्षकांनी आझाद मैदानावर आंदोलनात उपस्थिती दर्शवली शासनाने आंदोलनाची दखल घेऊन अधिवेशनानंतर शिक्षकांच्या वाढीव टप्पा दिला जाईल, अशी माहिती दिली.



जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे

याप्रसंगी स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष के पी पाटील सर्व राज्य समन्वयक यांच्या वतीने आंदोलन पुकारले होते अहिल्यानगर स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी अंशतः अनुदानित शिक्षकांना अनुदान मिळावे म्हणून संघटनेच्या वतीने विविध आंदोलने केली. राज्यातील ६० हजार शिक्षकांना या माध्यमातून न्याय मिळाला आहे, असे शिंदे यांनी सांगितले.

# महिलेस मारहाण केल्याच्या खटल्यातून आरोपी निर्दोष

नगर – अंतर्गत वादातून महिलेस मारहाण केल्याच्या खटल्यातून आरोपीची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली. मंगळवारी (८ जुलै) हा निकाल देण्यात आला.

१२ फेब्रूवारी २०२१ रोजी फिर्यादी धुण्याभांड्याचे कामकाज करून गंगा उद्यान शेजारील रस्त्याने पायी घरी जात असताना लक्ष्मी मातेच्या मंदिरासमोर पती सोबत काम करणारा आरोपी आला व फिर्यादीस म्हणाला की, माझ्यासोबत बुऱ्हाणनगरला चल! असे म्हटल्यावर फिर्यादीने नकार दिला व तिच्या पतीला फोन केला. सदर प्रकार सांगणार तेवढ्यात आरोपीने तिचा फोन हिसकावून घेतला. सदर गोष्टीचा आरोपीस राग आल्याने आरोपीने रागात फिर्यादीच्या तोंडावर बुक्का मारला तसेच हातातील लोखंडी कड्याने तोंडावर मारून तिचे दात पाडून तिला रक्तबंबाळ केले. सदर प्रकार कोणास सांगितला तर तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणुन तिथुन पळून गेला. अश्या आशयाची फिर्याद तोफखाना पोलिस स्टेशन येथे दाखल करून भा.द.वी. कलम ३२४, ३२५, ३२६, ५०६ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला होता. संपूर्ण प्रकरणाचा तपास करून पोलिसांनी आरोपीविरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर खटल्यात सरकार पक्षाच्या वतीने एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले.

साक्षीदारांच्या जबाबातील विसंगती व आरोपीच्या वतीने ॲड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी घेतलेला उलटतपास आणि मांडलेला बचावात्मक युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरून आरोपी विरुद्ध सबळ पुरावा नसल्याने व सरकार पक्ष आरोपी विरुद्ध केस सिध्द करू न शकल्याने न्यायालयाने आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे.

आरोपीतर्फे ॲड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी काम पाहिले व ॲड. गणेश शेटे यांनी त्यांना सहकार्य केले.

# गुरु र ब्रह्म.. गुरू र विष्णु.. गुरु र देवो महेश्वरा..

सर्वप्रथम सर्व गुरु जणांना गुरु पौर्णिमेच्या शुभेच्छा.

गुरु पौर्णिमेला ही एक आषाढ महिन्यात येणारी पौर्णिमा आहे. या पौर्णिमेला व्यास पौर्णिमा देखील म्हणतात. कारण महाभारतासारख्या महाकाव्याच ज्यांनी लिखाण केले आणि वेद, पुराणे यासारखे साहित्य जगाला दिले, असे महर्षी व्यास ऋषी यांचा जन्मदिवस असतो म्हणून व्यास पौर्णिमा देखील म्हणतात. खूप ठिकाणी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला होता. हा सण म्हणजे आपल्या गुरूबद्दल, आदर प्रेम कृतद्यता व्यक्त करण्याचा दिवस.

आपल्या भारतीय संस्कृतीत आपल्या गुरुला हे ईश्वर स्वरुप स्थान दिले आहे. गुरु बिन ज्ञान नाही हे म्हणतात ते खरे आहे. जर गुरुच नसता तर हे अफाट ज्ञान प्राप्तच झाले नसते. पण मला वाटते, फक्त गुरू आणि शिष्य हे आपल्याला शाळा, कॉलेज मध्ये नसतो. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर जो मार्ग दाखवतो, तो गुरुच असतो. आई आणि वडील हे तर आपले पहिले गुरू असतात. त्यांच्याकडून जे संस्कार भेटतात, ते कोठेच भेटत नाही. गुरु शिष्य ही परंपरा खूप दिवसांपासून चालत आलेली आहे. या परंपरेला अत्यंत पवित्र आणि आदर्श मानले जाते. आपल्या इतिहासात आणि मागील काही कथा पुराणामध्ये अनेक लोकप्रिय आणि प्रसिद्ध अशा जोड्या आपल्याला एक आदर्श ठेऊन गेल्या आहेत.



जसे की, १. आचार्य चाणक्य यांनी आपल्या बुद्धी चातुर्याच्या जोरावर एक शूर, वीर बलाढ्य आणि पराक्रमी असा योद्धा राजा घडवला, ज्याला आपण सम्राट चंद्रगुप्त मौर्य म्हणतो.

२. रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद. रामकृष्ण परमहंस यांनी अध्यात्मिक तसेच एकाग्रतेचे असे शिक्षण विवेकांदांना दिले आणि नरेंद्रचा ज्यांनी विवेकानंद केला अशा थोर गुरुच नाव म्हणजे रामकृष्ण परमहंस. अखंड युवा पिढीचे आदर्श असे स्वामी विवेकानंद. केस वाढवून देवानंद होण्यापेक्षा ज्ञान वाढवून विवेकानंद व्हावे हे खरेच आहे.

३. रमाकांत आचरेकर आणि सचिन तेंडुलकर. रमाकांत यांनी सचिन तेंडुलकर यांना क्रिकेटचे प्रशिक्षण दिले आणि एक उत्तम क्रिकेटपटू या भारताला दिला.

४. द्रोणाचार्य आणि अर्जुन – द्रोणाचार्य हे कौरव आणि पांडवांचे गुरु होते. द्रोणाचार्य यांनी अर्जुनाला धनुर्विद्येचे प्रशिक्षण दिले. आणि एक उत्तम असा धनुर्धर बनवला.

५. वशिष्ठ आणि श्रीकृष्ण – गुरु वशिष्ठ यांनी श्रीकृष्ण यांनी नैतिकतेचे, आध्यात्मकतेचे वेदशास्त्राचे याबद्दल शिक्षण दिले.

आपल्या आयुष्यातील प्रत्येक गुरु, आई वडील, प्रेरणादायी व्यक्तीचे, शाळा, कॉलेजमधील प्राध्यापकांचे या दिवशी आपण आशीर्वाद नक्कीच घेतले पाहिजे आणि त्यांचा आदर्श पुढे नक्कीच घेतला पाहिजे, हीच खरी गुरुपोर्णिमा......

**– प्रा. कांबळे पूनम संजय**

डिप्लोमा कॉलेज ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, जामखेड

